# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
# दिनांक : १३.०३.२०१२ रोजी दुपारी २.३० वाजता
# आयोजित केलेल्या अर्थसंकल्पीय विशेष बैठकीचे कार्यवृत्त

**बाब क्रमांक : १**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे**
**सन् २०११-२०१२ चे सुधारित अंदाजपत्रक व**
**सन् २०१२-२०१३ चे अर्थसंकल्पीय अंदाज.**

--------------------

**ठराव क्रमांक : ६५५३** **दिनांक : १३/०३/२०१२**

एकमताने निर्णय घेतला की, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २०११-२०१२ च्या सुधारित अंदाजपत्रक रु. १०८.४१ कोटी रक्कमेच्या तूटीच्या अंदाजपत्रकास व सन २०१२-२०१३ च्या रु. ९५०.५७ कोटी रक्कमेच्या तुटीच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच बांधकाम कार्यक्रमास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यांत येते.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या**

**दिनांक : १३/०३/२०१२ रोजी सायंकाळी ४.३० वाजता**

**आयोजित केलेल्या २४१ व्या बैठकीचे कार्यवृत्त**

**बाब क्रमांक : २४१/२**

**विषय :- औरंगाबाद मंडळाकडील मोकळया भुखंडावर गृहनिर्माण प्रकल्पाचे काम मे. बी. जी. शिर्के कं.टे.प्रा.लि. यांना टर्न की तत्वानुसार देण्याबाबत.**

---------------------

मुख्य अभियंता-२ / प्राधिकरण यांनी सदर बाब सर्क्युलेशन पध्दतीने मंजूर करण्यात आली असून खालील ठरावास सर्क्युलेशन पध्दतीने मान्यता देण्यात आली असल्याचे सांगितले.

**ठराव क्रमांक : ६५५२ दिनांक : ३/०३/२०१२**

एकमताने निर्णय घेण्यात आला की, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या मोकळया जमिनीवर टर्न की तत्वानुसार गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याच्या योजनेचे काम मे. बी. जी. शिर्के कं.टे.प्रा.लि. हयांना देण्याबाबतच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजुरी देत आहे.

१.     औरंगाबाद मंडळांतर्गत कामे कार्यादेश दिल्यापासून खाली तक्त्यात नमुद केलेली रु. १३१.०४ कोटी रक्कमेची कामे १८ + ६ महिन्यांचे कालावधीत पूर्ण करावीत. सदर कामाची सविस्तर तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **योजना** | **गाळयांची संख्या** | **देय जोते क्षेत्रफळ चौ. फूट** | **बांधकाम दर प्रती चौ. फुट** | **निविदा किंमत [कोटीमध्ये]** |
|---|---|---|---|---|---|
| १. | मध्यम उत्पन्न गट वाळूंज, एम.आय.डी.सी. | २७२ | २४२८१२.२७ | १२९९.०० | ३१.५४ |
| २ | मध्यम उत्पन्न गट तिसगांव | २८८ | २५७०९५.३४ | १२९९.०० | ३३.४० |
| ३ | मध्यम उत्पन्न गट तिसगांव | ७२ | ६३०५५.५१ | १२९९.०० | ८.१९ |
| ४ | दुकाने तिसगांव | ४२ दु | १४२७४.४६ | १२९९.०० | १.८५ |
| ५ | देवळाई, अल्प उत्पन्न गट | ४२४ | २३७७३१.३३ | १२२२.०० | २९.०५ |
| ६ | देवळाई, मध्यम उत्पन्न गट | २२ | २२११५.५० | १२९९.०० | २.८७ |
| ७ | अल्प उत्पन्न गट पैठण | १९०+१२ दु. | १०८१७३.०३ | १२२२.०० | १३.२२ |
| ८ | दुकाने पैठण | ५ दु | ३०४४.२७ | १२२२.०० | ०.३७ |
| ९ | मालजीपुरा अल्प उत्पन्न गट | ४८ | ३०४५५.६६ | १२४८.०० | ३.८० |
| १० | मालजीपुरा अल्प उत्पन्न गट [दुकाने] | २४ दु + ८ का | ९७२३.३४ | १३२५.०० | १.२९ |
| ११ | मध्यम उत्पन्न गट मालजीपुरा | २४ | २०८६६.४४ | १३२५.०० | २.७६ |
| १२ | मध्यम उत्पन्न गट [दुकाने] मालजीपुरा | १२ दु + ४का | ७०५८.३८ | १३२५.०० | ०.९४ |
| १३ | उच्च उत्पन्न गट, मालजीपुरा | ७ | १२६३३.०६ | १३९०.०० | १.७६ |
| | एकुण | १३४७ + ९५ दु + १२का | १०२९०३९ | | १३१.०४ |

२.	विक्री गाळयांसाठी बांधकामाचे दर नवीन शासन निर्णयानुसार रुपये ८२४/- प्रती चौरस फुट दराने बांधकाम [लिफटसहित] अधिन सुधारित विनिर्देशासाठी व रुपये ८०५/- प्रती चौरस फुट दराने बांधकाम [विनालिप्ट] अधिक सुधारित विनिर्देशासाठी सोबत जोडलेल्या [प्रपत्र क्रमांक २] प्रमाणे अधिक दर, अधिक भाववाढ आणि विक्रीकर या दराने बांधकाम देण्याचे प्रस्तावित आहे. शासनाच्या दिनांक १७/०९/१९९९ रोजीच्या बैठकीत कार्यवृत्तांतानुसार व दिनांक २२/०९/१९९९ च्या पत्रानुसार सुधारित बांधकाम व विनिर्देश अटी पूर्वीच्या योजनेनुसार लागू राहतील.

३.	वर नमुद केलेल्या दरानुसार केलेल्या कामाच्या किंमतीमध्ये भाववाढ किंवा घट सिमेंट व स्टील वगळून इतर बाबींच्या जून २००४ च्या मूळ निर्देशांकानुसार म्हाडाच्या प्राईझ व्हेरिएशनफॉर्म्युला प्रमाणे करण्यात यावी. मात्र सिमेंट व स्टीलच्या बाबतीत भाववाढ किंवा घट, काम सुरु असताना बाजाराभावाप्रमाणे दर व खालीलप्रमाणे दिलेल्या स्टाररेटमधील फरकाप्रमाणे काढण्यात यावी.

स्टील - ३२०००/- प्रती टन.

सिमेंट - २८२०/- प्रती टन.

४.	कंत्राटाप्रमाणे देण्यात येणा-या १६ टक्के व्याजमुक्त मोबालाईझेशन अग्रीमावर सदर अग्रीम देण्यात आलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष काम सुरु होईपर्यंत व्याज आकारण्यात यावे. सदर व्याजाचा दर प्राधिकरणास मिळणा-या गुंतवणुकीच्या व्याजाच्या दराएवढा किंवा वित्त नियंत्रक / प्राधिकरण यांच्या सुचनेनुसार आकारण्यात यावा.

५.	योजनेस आवश्यक असलेल्या सुविधांचे काम जसे की सुरक्षा भिंत, पायवाटा, गटारे, मलनिःसारण व जलवाहिन्या टाकणे, दिवाबत्ती इत्यादी तसेच सुविधा इमारतींचे काम जसे की चक्की, दवाखाना, सुविधा दुकाने इत्यादी कामे, कामाचे मूळ कंत्राटदार मेसर्स बी. जी. शिर्के कंपनीकडून अतिरिक्त सुविधांचे काम सुरु करताना प्रचलीत असणा-या दरसुचीवर (D.S.R./M.C.G.M.'s FMR) बी-१ करारनामा अंतर्गत करुन घेण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

जे दर दरसुचीमध्ये नसतील त्याचे विश्लेषण (Rate Analysis) करुन सक्षम अधिका-यांची मंजुरी घेण्यात यावी. तसेच सुविधा कामाच्या किंमतीमध्ये भाववाढ किंवा घट काम सुरु करताना अस्तित्वात असलेल्या निर्देशांक व काम सुरु असताना अस्तित्वात असलेल्या निर्देशांकाच्या फरकानुसार म्हाडाच्या प्राईस व्हेरिएशनफॉम्युल्याप्रमाणे देण्यात यावी.

६. सदर कामे महानगर पालिकेची मंजुरी मिळाल्यानंतर, मंजुर नकाशाप्रमाणे योजना कार्यान्वित करण्याचे आदेश देण्यात यावेत.

७. प्राधिकरणाच्या धोरणानुसार कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी घरांची मागणी अजमाविण्यात येते. परंतु मुंबई मंडळानुसार घरे पुर्ण झाल्यानंतरच घरे विक्री करण्यबाबतची जाहिरात देण्याचे प्रस्तावित आहे. भविष्यात सदर योजनेमुळे म्हाडास कोणत्याही प्रकारचा तोटा व नुकसान होणार असल्यास, शासनाचे दिनांक ०२/०३/२००१ चे पत्रानुसार त्याची जबाबदारी मेसर्स बी. जी. शिर्के कंपनी यांचेवर राहील व ते भरपाई करुन देतील या आशयाचे त्यांचे कडून हमीपत्र [अंडरटेकींग] घेण्यात येईल व मगच संपूर्ण बांधकाम हाती घेण्यासंबंधीचे कार्यादेश देण्यात येतील.

८. सदर योजनांमधील खुल्या विक्रीच्या गाळयांची जाहिरात नमुना सदनिका तयार झाल्यानंतर देण्यात यावी जेणेकरुन लाभार्थीकडून चांगला प्रतिसाद मिळेल.

९. नकाशास सक्षम महानगरपालिकेची वा तत्सम प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतर काम सुरु करण्यात यावे. प्रत्यक्षात महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार नकाशांत आवश्यक तेथे बदल होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास सदर प्रकल्प महानगरपालिकेच्या मंजुरीनुसार करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २४१/५**

**विषय :- पुणे मंडळाच्या भविष्यातील गृहनिर्माण योजनांकरिता म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गत खाजगी जमिनी चालू बाजार भावाने खरेदी करण्याबाबत पुणे मंडळ कार्यालयात मौजे - बो-हाडेवाडी (मोशी ), ता.हवेली, जिल्हा पुणे येथील स.नं.१११ पै, १२३ पै, एकूण क्षेत्र २०००० चौ.मी. किंमत रु.३२,०६,४०,०००/- ( रु.बत्तीस कोटी सहा लाख चाळीस हजार फक्त ) किंमतीचा जमीनमालक मे.जी.के. डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.श्री.हरी निचलदास जैस्वानी व २. श्री.विनोद प्रेमचंद चांदवानी यांचा दाखल प्रस्ताव.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६५५४** **दिनांक : १३/०३/२०१२**

एकमताने निर्णय घेतला कीं, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गत मौजे बो-हाडेवाडी ( मोशी ), ता.हवेली, जिल्हा पुणे येथील स.नं.१११ पै., १२३ पै. एकूण क्षेत्र २०००० चौ.मि., प्रती चौ.मी.दर १६०३२/- प्रमाणे एकूण रु. ३२,०६,४०,०००/- ( रुपये बत्तीस कोटी सहा लाख चाळीस हजार फक्त ) किंमतीची जमिन जमिनमालक मे.जी.के.डेव्हलपर्स तर्फे भागीदार १. श्री.हरी निचलदास जैस्वानी व २. श्री.विनोद प्रेमचंद चांदवानी यांचेकडून खरेदी करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. मुख्य अधिकारी / पुणे मंडळ यांनी यासंदर्भात खालीलप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

१. सदर स.नं.१११ पैकी व १२३ पैकी मौजे बो-हाडेवाडी ( मोशी ), ता.हवेली, जिल्हा पुणे एकूण क्षेत्र २०००० चौ.मि. या जमिनीची प्रथम अधिकृत मोजणी व मालकीहक्काची खात्री (

Title Search ) करुन घेण्यात यावी. तसेच २.५ चटईक्षेत्रफळ अनुज्ञेयाबाबत खातरजमा करण्यात यावी.

२. जमिनीच्या मालकी हक्क सदरी ( ७/१२ ) असणारे व प्रत्यक्ष मोजणीप्रमाणे होणारे यापैकी जे कमी असेल अशा क्षेत्रफळाकरिता प्रती चौ.मि. रु. १६०३२/- ( रुपये सोळा हजार बत्तीस फक्त ) या दराने मोबदला अदा करुन संबंधित जमिनमालक यांचेशी विधी सल्लागार / प्राधिकरण यांचे संमतीने म्हाडाचे नांवे जमिनीचे खरेदीखत नोंदणीकृत करुन घ्यावे.

३. सदर जमिनीची मोजणी होण्यास विलंब होत असल्यास व जमिन मालकांचा आग्रह असल्यास मालकी हक्काची खात्री ( Title Search ) करुन ९०% मोबदला अदा करुन म्हाडाचे नांवे जमिनीचे खरेदीखत करण्यात यावे व उर्वरित १०% वा मोजणीनुसार भरणा-या क्षेत्रफळानुसार निश्चित होणारी उर्वरित रक्कम मोजणीनंतर अदा करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २४१/६**

**विषय :- पुणे मंडळाच्या भविष्यातील गृहनिर्माण योजनांकरिता म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गत खाजगी जमिनी चालू बाजार भावाने खरेदी करण्याबाबत पुणे मंडळ कार्यालयात मौजे - महाळुंगे, ता.खेड, जिल्हा पुणे येथील एकूण क्षेत्र ११७१३४ चौ.मी. ( ११.७१ हेक्टर ) व एकूण किंमत रु. ६०,५२,३१,३७८/- ( रु.साठ कोटी बावन्न लाख एकतीस हजार तीनशे अठ्ठयाहत्तर फक्त ) किंमतीचा जमीनमालक मे.तिरुपती डेव्हलपर्स तर्फे भागीदार १.श्री.विनित कृष्णकुमार गोयल व २. श्री.शाम साधुराम आगरवाल यांचा दाखल प्रस्ताव.**

---------------------

**ठराव क्रमांक : ६५५५** **दिनांक : १३/०३/२०१२**

एकमताने निर्णय घेतला कीं, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गत महाळुंगे, ता.खेड, जिल्हा पुणे येथील स.नं.३४, ४४, ४९, १२९, १३०/१ब, १३०/२, १३०/३, १३०/४ एकूण क्षेत्र १,१७,१३४ चौ.मी. प्रती चौ.मी. दर रु. ५१६७/- प्रमाणे एकूण रु. ६०,५२,३१,३७८/- ( रु.साठ कोटी बावन्न लाख एकतीस हजार तीनशे अठ्ठयाहत्तर फक्त ) किंमतीची जमिन जमिनमालक मे.तिरुपती डेव्हलपर्स तर्फे भागीदार १. श्री.विनित कृष्णकुमार गोयल व २. शाम साधुराम आगरवाल यांचेकडून खरेदी करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. मुख्य अधिकारी / पुणे मंडळ यांनी यासंदर्भात खालीलप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

१. सदर स.नं.३४, ४४, ४९, १२९, १३०/१ब, १३०/२, १३०/३, १३०/४ महाळुंगे, ता.चोड, जिल्हा पुणे एकूण क्षेत्र १,१७,१३४ चौ.मी. या जमिनीची प्रथम अधिकृत मोजणी व मालकीहक्काची खात्री ( Title Search ) करुन घेण्यात यावी. तसेच २.५ चटईक्षेत्रफळ अनुज्ञ ेयाबाबत खातरजमा करावी.

२. जमिनीच्या मालकी हक्क सदरी ( ७/१२ ) असणारे व प्रत्यक्ष मोजणीप्रमाणे होणारे यापैकी जे कमी असेल अशा क्षेत्रफळाकरिता प्रती चौ.मि. रु. ५१६७/- ( रुपये पाच हजार एकशे सदुसष्ट फक्त ) या दराने मोबदला अदा करुन संबंधित जमिनमालक यांचेशी विधी सल्लागार / प्राधिकरण यांचे संमतीने म्हाडाचे नांवे जमिनीचे खरेदीखत नोंदणीकृत करुन घ्यावे.

३. सदर जमिनीची मोजणी होण्यास विलंब होत असल्यास व जमिन मालकांचा आग्रह असल्यास मालकी हक्काची खात्री ( Title Search ) करुन ९०% मोबदला अदा करुन म्हाडाचे नांवे जमिनीचे खरेदीखत करण्यात यावे व उर्वरित १०% वा मोजणीनुसार भरणा-या क्षेत्रफळानुसार निश्चित होणारी उर्वरित रक्कम मोजणीनंतर अदा करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २४१/७**

**विषय :- नाशिक मंडळाच्या भविष्यातील गृहनिर्माण योजनांकरिता म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गत खाजगी जमिनी खरेदी करण्याबाबत नाशिक मंडळ कार्यालयात मौजे - पंचक, नाशिक ता.नाशिक, जिल्हा नाशिक येथील स.नं.४३/२ब / १अ / २ स.क्र. ४३/२ब / २ एकूण क्षेत्र ४५०० चौ.मी. व एकूण किंमत रु.७,४२,५०,०००/- ( रु.सात कोटी बेचाळीस लाख पन्नास हजार फक्त ) किंमतीचा जमीनमालक १.श्री.राजेंद्रे दत्तात्रय गायकवाड व २. श्री.पंकज कन्हैयालाल आलठक्कर यांचा दाखल प्रस्ताव.**

---

**ठराव क्रमांक : ६५५६** **दिनांक : १३/०३/२०१२**

एकमताने निर्णय घेतला कीं, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गत मौजे - पंचक, नाशिक ता.नाशिक, जिल्हा नाशिक येथील स.नं.४३/२ब / १अ / २ स.क्र. ४३/२ब / २ एकूण क्षेत्र ४५०० चौ.मी. व एकूण किंमत रु.७,४२,५०,०००/- ( रु.सात कोटी बेचाळीस लाख पन्नास हजार फक्त ) किंमतीची जमिन जमीनमालक १.श्री.राजेंद्रे दत्तात्रय गायकवाड व २. श्री.पंकज कन्हैयालाल आलठक्कर यांचेकडून खरेदी करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. मुख्य अधिकारी / नाशिक मंडळ यांनी यासंदर्भात खालीलप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

१. सदर स.नं.४३/२ब / १अ / २ स.क्र. ४३/२ब / २ मौजे - पंचक, नाशिक ता.नाशिक, जिल्हा नाशिक येथील एकूण क्षेत्र ४५०० चौ.मी. या जमिनीची प्रथम अधिकृत मोजणी व मालकीहक्काची खात्री ( Title Search ) करुन घेण्यात यावी. तसेच २.५ चटईक्षेत्रफळ अनुज्ञेयाबाबत खातरजमा करण्यात यावी.

२. जमिनीच्या मालकी हक्क सदरी ( ७/१२ ) असणारे व प्रत्यक्ष मोजणीप्रमाणे होणारे यापैकी जे कमी असेल अशा क्षेत्रफळाकरिता प्रती चौ.मि. रुपये १६५००/- ( रुपये सोळा हजार पाचशे फक्त ) या दराने मोबदला अदा करुन संबंधित जमिनमालक यांचेशी विधी सल्लागार / प्राधिकरण यांचे संमतीने म्हाडाचे नांवे जमिनीचे खरेदीखत नोंदणीकृत करुन घ्यावे.

३. सदर जमिनीची मोजणी होण्यास विलंब होत असल्यास व जमिन मालकांचा आग्रह असल्यास मालकी हक्काची खात्री ( Title Search ) करुन ९०% मोबदला अदा करुन म्हाडाचे नांवे जमिनीचे खरेदीखत करण्यात यावे व उर्वरित १०% वा मोजणीनुसार भरणा-या क्षेत्रफळानुसार निश्चित होणारी उर्वरित रक्कम मोजणीनंतर अदा करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २४१/९**

**विषय :- पुणे मंडळाच्या भविष्यातील गृहनिर्माण योजनांकरिता म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गत खाजगी जमिनी चालू बाजार भावाने खरेदी करण्याबाबत पुणे मंडळ कार्यालयात मौजे - ताथवडे, ता.मुळशी, जिल्हा पुणे येथील स.नं.१२६ अ व ब, १२७/१/१ व २ एकूण क्षेत्र ५७,६०० चौ.मी. व एकूण किंमत रु.१०५,४०,१०,८८०/- ( रु.एकशपाच कोटी चाळीस लाख दहा हजार आठशे ऐंशी फक्त ) किंमतीचा जमीनमालक १.श्री.सुभाष सिताराम गोयल व २. अनुज उमेश गोयल ३. श्री.अमोल राजेंद्र गोयल व ४. श्री.महेद्र फकिरचंद साबद्रा यांचा दाखल प्रस्ताव.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५५७ दिनांक : १३/०३/२०१२**

एकमताने निर्णय घेतला कीं, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत म्हाड अधिनियम कलम ५२ अंतर्गत मौजे - ताथवडे, ता.मुळशी, जिल्हा पुणे येथील स.नं.१२६ अ व ब, १२७/१/१ व २ एकूण क्षेत्र ५७,६०० चौ.मी. व एकूण किंमत रु.१०५,३९,६४,८००/- ( रु.एकशे पाच कोटी एकोणचाळीस लाख चौसष्ट हजार आठशे फक्त ) किंमतीचा जमीनमालक १.श्री.सुभाष सिताराम गोयल व २.अनुज उमेश गोयल ३. श्री.अमोल राजेंद्र गोयल व ४. श्री.महेद्र फकिरचंद साबद्रा यांचेकडून खरेदी करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. मुख्य अधिकारी / पुणे मंडळ यांनी यासंदर्भात खालीलप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.

१. सदर स.नं. स.नं.१२६ अ व ब, १२७/१/१ व २ मौजे - ताथवडे, ता.मुळशी, जिल्हा पुणे एकूण क्षेत्र ५७,६०० चौ.मी. या जमिनीची प्रथम अधिकृत मोजणी व मालकीहक्काची खात्री ( Title Search ) करुन घेण्यात यावी. तसेच २.५ चटईक्षेत्रफळ अनुज्ञेयाबाबत खातरजमा करण्यात यावी.

२. जमिनीच्या मालकी हक्क सदरी ( ७/१२ ) असणारे व प्रत्यक्ष मोजणीप्रमाणे होणारे यापैकी जे कमी असेल अशा क्षेत्रफळाकरिता प्रती चौ.मि. रु. १८२९८/ ( रुपये अठरा हजार दोनशे अठ्ठयाणव फक्त ) या दराने मोबदला अदा करुन संबंधित जमिनमालक यांचेशी विधी सल्लागार / प्राधिकरण यांचे संमतीने म्हाडाचे नांवे जमिनीचे खरेदीखत नोंदणीकृत करुन घ्यावे.

३. सदर जमिनीची मोजणी होण्यास विलंब होत असल्यास व जमिन मालकांचा आग्रह असल्यास मालकी हक्काची खात्री ( Title Search ) करुन ९०% मोबदला अदा करुन म्हाडाचे नांवे जमिनीचे खरेदीखत करण्यात यावे व उर्वरित १०% वा मोजणीनुसार भरणा-या क्षेत्रफळानुसार निश्चित होणारी उर्वरित रक्कम मोजणीनंतर अदा करण्यात यावी.

सदर ठरावाची अंमलबजावणी स्थायीकरणाची वाट न पाहता करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २४१/१२**

**विषय :- खाजगी जमिनींवर म्हाडासाठी मंजूर झालेल्या २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाअंतर्गत म्हाडा व खाजगी जमिन मालक यांच्या मार्फत एकत्रितपणे ( Joint Venture ) गृहनिर्माण योजना राबविण्याबाबत.**

----------------------

**ठराव क्रमांक : ६५५८** **दिनांक : १३/०३/२०१२**

एकमताने निर्णय घेतला कीं, खाजगी जमिनींवर म्हाडासाठी मंजूर झालेल्या २.५ चटईक्षेत्र निर्देशांकाअंतर्गत पारदर्शक पध्दतीचा अवलंब करुन निवड केलेल्याम्हाडा व खाजगी जमिन मालक यांच्या मार्फत एकत्रितपणे ( Joint Venture ) गृहनिर्माण योजना राबविण्याकरिता तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.